## महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर.
## नागरिकाची सनद

प्रस्तावना -केंद्र शासनाने स्वीकृत केलेल्या तांत्रिक मानकानुसार व मार्गदर्शक तत्वानुसार, जनतेच्या सहभागाने, गावक-यांच्या तसेच अशासकीय संघटनांच्या सहभागाव्दारे जलसंधारण व पाणलोट विकास कार्यक्रमांची अंमलबजावाणी करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला. या उद्दीष्टपूर्तीसाठी राज्यात पाटबंधारे प्रकल्प यासह जलसंधारण कामांचे प्रचलन, प्रवर्तन आणि शीघ्र विकास व नियमन करण्याकरिता विशेष तरतूदी करण्यासाठी (सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १३ प्रख्यापित केला व नंतर उक्त अध्यादेशाचे महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम, २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३) मध्ये रुपांतर करण्यात आले.

**महामंडळाची स्थापना व व्याप्ती** - महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाची स्थापना दि. २२ ऑगस्ट, २००० रोजी झाली असून, त्याचे मुख्यालय छत्रपती संभाजीनगर येथे आहे. महामंडळ निगम निकाय असून त्याच्या स्थापनेचा मुख्य उद्देश राज्यातील 0 ते ६०० हेक्टर पर्यतच्या सिंचन क्षमतेच्या लघु पाटबंधारे प्रकल्प व जलसंधारण कामांचे प्रचलन, प्रवर्तन आणि शीघ्र विकास व नियमन करणे हा आहे.

**महामंडळाची घटना** - महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम २००० चे कलम ४ (१) अन्वये महामंडळात खालील सदस्यांचा समावेश आहे.

| अ.क्र. | पदाधिकारी | पद |
|---|---|---|
| १ | मंत्री, मृद व जसंधारण | पदसिध्द अध्यक्ष |
| २ | राज्यमंत्री,मृद व जलसंधारण | पदसिध्द उपाध्यक्ष |
| ३ | कृषी मंत्री | पदसिध्द सदस्य |
| ४ | जलसंपदा मंत्री | पदसिध्द सदस्य |
| ५ | शासन सचिव, नियोजन विभाग | पदसिध्द सदस्य |
| ६ | शासन सचिव, वन विभाग | पदसिध्द सदस्य |
| ७ | शासन सचिव, कृषि विभाग | पदसिध्द सदस्य |
| ८ | शासन सचिव, जलसंपदा विभाग | पदसिध्द सदस्य |
| ९ | शासन सचिव, जलसंधारण / रोहयो विभाग | पदसिध्द सदस्य |
| १० | शासन सचिव, ग्रामविकास विभाग | पदसिध्द सदस्य |
| ११ | संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदना उपयोजना केंद्र, नागपुर | पदसिध्द सदस्य |
| १२ | संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे | पदसिध्द सदस्य |
| १३ | व्यवस्थापकीय संचालक | पदसिध्द सदस्य सचिव |
| १४ | महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांमधून राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे दोन सदस्य | आतापर्यंत नियुक्ती झाली नाही |
| १५ | महाराष्ट्र विधान परिषदेच्या सदस्यांमधून राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे दोन सदस्य | आतापर्यंत नियुक्ती झाली नाही |
| १६ | पाटबंधारे क्षेत्रातील विशेष माहिती व प्रत्यक्ष अनुभव असलेला राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य | आतापर्यंत नियुक्ती झाली नाही |

| | | |
|---|---|---|
| १७ | आर्थिक क्षेत्राची विशेष माहिती असलेला, राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य | आतापर्यंत नियुक्ती झाली नाही |

कार्यकारी समिती :- अधिनियमातील कलम ५ व महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) अधिनियम, २००१ (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २०) अनुसार महामंडळाच्या कार्यकारी समितीत खालील सदस्यांचा समावेश आहे.

| अ.क्र. | पदाधिकारी | पद |
|---|---|---|
| १ | मंत्री, मृद व जलसंधारण | पदसिध्द अध्यक्ष |
| २ | राज्य मंत्री, मृद व जलसधारण | पदसिध्द उपाध्यक्ष |
| ३ | महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक | सदस्य सचिव |
| ४ | अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, प्रादेशिक क्षेत्र, पुणे | सदस्य |
| ५ | संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे | सदस्य |
| ६ | प्रधान मुख्य वन संरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, पुणे | सदस्य |
| ७ | महामंडळाचे मुख्य लेखा व लेखा परीक्षा अधिकारी | सदस्य |

महामंडळाने /संचालक मंडळ/ कार्यकारी समितीने मंजूर केलेली कामे कार्यान्वित करण्यासाठी महामडंळाची स्वतंत्र यंत्रणा नाही. सदर कामे अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, प्रादेशिक क्षेत्र, पुणे / नागपुर यांच्या मुख्यालय, मंडळ कार्यालय व जिल्हा कार्यालयामार्फत कार्यान्वित करण्यात येतात.

जिल्हा जलसंधारण अधिकारी, यांचे स्तरावर योजनेचे अंदाजपत्रक तयार होण्यासाठी तीन महिने, महामंडळाचे स्तरावर कामास मंजुरी प्रदान करण्यासाठी एक ते दोन महिने, निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यास साधारणत एक ते दीड महिना, महामंडळाचे स्तरावर निविदा मंजूर होण्यास एक महिना लागतो.

कामाचे आदेश दिल्यानंतर कामाचे स्वरुपानुसार काम पूर्ण करण्यात येते. कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गा-हाणी असल्यास त्यासंबंधी व्यवस्थाकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे तक्रार नोंदविता येईल. त्याचा दूरध्वनी क्रमांक 0240-2361244 व email:- mwccabd@yahoo.co.in असा आहे.

जलसंधारण महामंडळाच्या संबंधित नियम, अधिनियम, शासन निर्णय www. maharashtra.gov.in व http://swcd.maharashtra.gov.in या शासनाच्या जलसंधारण विभागाच्या संकेतस्थळावर (वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले आहेत.

नागरिकांची सनदेच्या उपयुक्ततेबाबत तथा परिणामकारकतेचा आढावा जलसंधारण विभागाकडून दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यक्तेनुसार बदल करण्यात येतील.

| अ.क्र. | मुद्दा | तपशिल |
|---|---|---|
| 1 | महामंडळाची स्थापना, मुख्यालय | महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाची स्थापना छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक २२.०८.२००० रोजी झाली. |
| 2 | महामंडळामार्फत कोणती कामे केली जातात व त्याचे कार्यक्षेत्र काय आहे. | राज्यातील ० ते ६०० हेक्टर पर्यंत सिंचन क्षमता असलेली लघु सिंचन प्रकल्प राबविण्याचे काम महामंडळ करते. अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, प्रादेशिक क्षेत्र, पुणे / नागपुर, यांचे अधिनस्त असलेल्या आस्थापनेमार्फत ही कामे कार्यान्वित केली जातात. |
| 3 | ० ते ६०० हेक्टर सिंचन क्षमता असलेली लघु पाटबंधारे प्रकल्प हाती घेण्यासाठी कोण अर्ज करु शकतो व कोणाकडे अर्ज करावा. | कोणताही नागरिक अथवा लोकप्रतिनिधी 0 ते ६00 हेक्टरपर्यंत सिंचन क्षमता असलेली लघु सिंचन प्रकल्प हाती घेण्यासाठी संबंधित तालुका/ जिल्हयाच्या जिल्हा जलसंधारण अधिकारी (जलसंधारण) यांचेकडे अर्ज करता येईल. अर्ज साध्या कगदावर करावा. (विहित नमुना नाही.) |
| 4 | अर्ज / मागणी प्राप्त झाल्यानंतरची कार्यपध्दती | अर्ज / मागणी प्राप्त झाल्यानंतर संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकारी हे खालील कार्यपध्दतीचा अवलंब करतात.<br>अ) सदरची योजना तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या फलदायी असल्याची खात्री करतात.<br>ब) त्याची योग्यता पटल्यानंतर त्या योजनेचे अंदाजपत्रक तयार करुन अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, प्रादेशिक क्षेत्र, पुणे / नागपुर यांचेमार्फत महामंडळाकडे सादर करतात.<br>क) अंदाजपत्रकीय किंमत रुपये २५ कोटीपेक्षा कमी असल्यास महामंडळाच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात येते.<br>ड) अंदाजपत्रकीय किंमत रुपये २५ कोटीपेक्षा जास्त असल्यास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवले जाते.<br>इ) कार्यकारी समिती/संचालक मंडळाने मान्यता प्रदान केल्यानंतर अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, प्रादेशिक क्षेत्र, पुणे / नागपुर यांचेमार्फत संबंधित प्रादेशिक जलसंधारण अधिकारी /जिल्हा जलसंधारण अधिकारी यांच्याकडे निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी कळविण्यात येते.<br>ई) संबंधितांच्या स्तरावर निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यातर निविदा मान्यतेचा प्रस्ताव संबंधीत जिल्हा जलसंधारण अधिकारी व प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, प्रादेशिक क्षेत्र, पुणे / नागपुर यांच्यामार्फत महामंडळाकडे सादर केला जातो.<br>फ)कार्यकारी समिती/संचालक मंडळाने मान्यताप्रदान केल्यानंतर अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, प्रादेशिक क्षेत्र, पुणे / नागपुर यांचेमार्फत संबंधित प्रादेशिक जलसंधारण अधिकारी /जिल्हा जलसंधारण अधिकारी यांना संबंधित ठेकेदारास कामाचे आदेश निर्गमित करण्यासाठी कळविले जाते. |

| | | |
|---|---|---|
| 5 | वरील प्रक्रिया पूर्ण होण्यास साधारणत किती कालावधी लागतो. | अ) जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचे स्तरावर योजनेचे अंदाजपत्रक तयार होईपर्यंत सर्वसाधारणपणे तीन महिने,<br><br>ब) महामंडळाच्या स्तरावर कामास मंजुरी प्रदान करण्यासाठी एक ते दोन महिने.<br><br>क) निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यास साधारणत एक ते दीड महिना.<br><br>ड) महामंडळ स्तरावर निविदा मंजूर होण्यास एक महिना<br><br>इ) कामाचे आदेश दिल्यानंतर कामाचे स्वरुपानुसार काम पूर्ण करण्यात येते. |
| 6 | कामांची देयके कोण तयार करतात व ती कशी चुकती केली जातात. | अ) कामाच्या प्रगतीनुसार क्षेत्रीय स्तरावर कामांची तपासणी करुन मोजमाप पुस्तकांत नोंदी घेऊन त्याची देयके जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचे कार्यालयांतून मंजूर करुन देयकाची रक्कम प्रदानासाठी महामंडळाकडे पाठविली जातात.<br><br>ब) महामंडळ कार्यालयात देयकांची छाननी होऊन महामंडळाकडून संबंधित ठेकेदारांस धनादेशाव्दारे/RTGS व्दारे देयकाची रक्कम प्रदान करण्यात येते. तत्पूर्वी या कामासाठी आवश्यक असलेल्या निधीची मागणी शासनाकडे सादर केली जाते व निधी प्राप्त झाल्यानंतरच देयकाची रक्कम प्रदान करण्यात येते. |
| 7 | प्रकल्प/योजना पूर्ण होण्यासाठी किती कालावधी लागतो. | प्रकल्पाचे स्वरुपानुसार कालावधी लागतो. |
| 8 | कामांच्या बाबतीत कोणास तक्रार नोंदवावयाची असल्यास कोणाकडे नोदवावी. | सबंधीत जिल्हा जलसंधारण अधिकारी/ प्रादेशिक जलसंधारण अधिकारी/ अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, तसेच महामंडळ व्यवस्थापकीय संचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर तक्रार नोंदविता येईल. |
| 9 | महामंडळामार्फत राबविल्या जाणा-या कामासाठी निधी कोठून उपलब्ध होतो. | महामंडळाकडून दरवर्षी शासनास वार्षिक अंदाजपत्रक सादर करण्यात येते. मृद व जलसंधारण विभागाच्या मागण्यामध्ये त्याचा समोवश केला जातो व विधान मंडळाच्या मंजुरीनुसार महामंडळास निधी उपलब्ध करण्यात येतो. |